# राज्य सहकारी निवड करण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जुनी मध्यवर्ती ' मजला, पुणे-४११००१

फोन ... २६०५०६४१

ई-मेल आयडी :- comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/अधिकार-कर्मचारीरजापरवानगी/८४२/२०१४ दिनांक : २४/११/२०१४ ०५/१२/२०१४

## परिपत्रक

**वाचावे :** या कार्यालयाचे जा.क्र.रासनिप्रा/अधिकार-कर्मचारीरजापरवानगी/८४२/२०१४ दि. २४/११/२०१४

**विषय : राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक कामकाजाशी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या बदली/दीर्घ कालीन रजेबाबत...**

उपरोक्त विषयाबाबत या कार्यालयाकडील वाचावे मध्ये नमूद केल्यानुसार आपल्या कार्यालयातील निवडणूक कामकाजाशी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांची कोणत्याही प्रकारची बदली/ दीर्घ रजा या पुढे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे परवानगी शिवाय मंजूर करू नयेत अशा सूचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत.

तथापि सदर प्रकरणी संबंधितांकडून राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे करण्यात येणा-या पत्रव्यवहारा संबंधी कालापव्यय होण्याची शक्यता विचारात घेवून यापुढे वरीलप्रकारे निवडणूक कामकाजाशी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारची दीर्घ रजा संबंधित जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचे पूर्व परवानगीशिवाय मंजूर करुन घेऊ नये.

वरील प्रकारे दीर्घ रजा मंजूर करताना निवडणूक कामकाजामध्ये व्यत्यय/अडथळा/दिरंगाई निर्माण होणार नाही याची खबरदारी संबंधित मंजूरकर्ता अधिकारी व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी घ्यावयाची आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांचे मान्यतेनुसार.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सर्व (प्रशासन/लेखापरिक्षण)
२. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सर्व
३. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, सर्व

प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :

२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी , सर्व

**(कृ.मा.प.)**

प्रत माहितीस्तव सविनय रवाना :
१.मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२.मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे,साखर संकुल शिवाजीनगर, पुणे-५
३.मा.संचालक, हातमाग यंत्रमाग व वस्त्रोद्योग, म.रा.,नागपूर
४.मा.आयुक्त आदिवासी विकास, आदिवासी भवन, म.रा.नाशिक
५.मा.आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास, म.रा.मुंबई, वरळी सी फेस, मुंबई-१८
६.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, ५ वा मजला. वांद्रा मुंबई-५१
७.कार्यकारी संचालक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, एम.एम.आर.डी.ए.इमारत, वांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा (पूर्व) मुंबई-५१
८.मा.आयुक्त, मत्स्यालय, म.रा.मुंबई तारापोरवाला अ्र क्वीरिया, चर्नी रोड, मुंबई
९.अधिक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे / सोलापूर
१०.मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, कृपया उपरोक्त बाब आपले सर्व क्षेत्रिय कार्यालयाचे निदर्शनास आणून देण्यात यावी, व वरील सूचनांचे उल्लंघन होणार नाही या बाबत आपले स्तरावरुन कडक सूचना निर्गमीत करण्यात याव्यात.

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे